मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# हंबीरराव मोहिते यांच्या पुतळ्यांच्या जागेत बदल

## पिंपरी-चिंचवड महापालिकेला कोट्यवधींचा भुर्दंड?

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।** महापालिकेच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज यांचा भव्य पुतळा बोऱ्हाडेवाडी येथील विनायकनगर येथे उभारण्याचे काम सुरू होते. पायाचा चौथरा बांधण्यात आला असून ४० टक्के काम पूर्ण झाल्यानंतर आता पुतळ्याच्या जागेत बदल करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. त्यामुळे चौथरा उभारण्यासाठी केलेला पाच कोटींचा खर्च पाण्यात जाण्याची शक्यता आहे.बोऱ्हाडेवाडी येथील विनायकनगर येथे १४० फूट उंच छत्रपती संभाजी महाराज तसेच, सरसेनापती हंबीरराव मोहिते यांचा भव्य



पुतळा उभारण्याचे नियोजन केले. त्याच्या चौथऱ्याच्या कामाची निविदा राबवून धनेश्वर कन्स्ट्रक्शन ठेकेदाराला सन २०२० मध्ये काम दिले. १२ कोटी ५० लाखांच्या या कामाची मुदत दीड वर्षे होती. वेळेत काम न झाल्याने ठेकेदाराला ३१ डिसेंबर २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. आतापर्यंत ४० टक्के काम पूर्ण झाले आहे. छत्रपती संभाजी महाराज व सरसेनापती हंबीरराव मोहिते यांचा पुतळा बनविण्याचे काम दिल्ली येथे प्रसिद्ध शिल्पकार राम सुतार करीत आहेत.मात्र, आमदार महेश लांडगे यांनी विनायकनगर येथे पुतळा न उभारता तो पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) मोशी सेक्टर क्रमांक पाच व आठ येथील पुणे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि कन्व्हेशन केंद्राच्या (पीआयईसीसी) ठिकाणी उभारण्याची मागणी महापालिकेकडे केली. तसेच प्रदर्शन केंद्राच्या जागेत पुतळा उभारण्यासाठी जागेची मागणी त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली होती. त्यानुसार पीएमआरडीएने अडीच एकर जागा महापालिकेच्या ताब्यात दिली आहे. त्यामुळे त्या ठिकाणी पुतळा उभारण्यात येणार आहे. 'क' क्षेत्रीय कार्यालयाच्या स्थापत्य विभागाच्या छत्रपती संभाजी महाराज पुतळ्याच्या स्थळ बदलाच्या प्रस्तावास आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी सर्वसाधारण सभेची मान्यता दिली आहे.धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचा १०० फूट उंचीचा कांस्य धातूचा पुतळा असणार आहे. त्यासाठी ३२ कोटी ६६ लाख खर्च अपेक्षित आहे. पुतळ्याच्या ४० फूट उंचीच्या चौथऱ्याचा खर्च १२ कोटी ५० लाख इतका आहे. तसेच, त्याठिकाणी संभाजी महाराज सृष्टी उभारून आकर्षक विद्युत व्यवस्था केली जाणार आहे. त्यासाठी १५ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. या स्मारकाचा एकूण खर्च ६० कोटींपेक्षा जास्त होण्याची शक्यता आहे.आयुक्त शेखर सिंह म्हणाले की, दर्शनी भागात छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा उभारण्यासाठी स्थळ बदलले आहे. मोशी आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र परिसरात हा पुतळा उभारण्यात येणार आहे. पुणे-नाशिक महामार्गावरून तो स्पष्टपणे दिसेल. जुन्या ठिकाणी चौथऱ्याचे काम झाले आहे.

# पिंपरी-चिंचवड : मेरा युवा भारत या उपक्रमाविषयी जनजागृती

## लाईट हाऊसच्या प्रशिक्षणार्थ्यांनी घेतली मेरा युवा भारत उपक्रमाची माहिती

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।** युवकांमधील गुणांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी केंद्र शासनाच्या युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालयाच्या वतीने मेरा युवा भारत उपक्रम राबविण्यात येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांमध्ये मेरा युवा भारत या उपक्रमाविषयी जनजागृती व्हावी, यासाठी पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लि.च्या वतीने लाईट हाऊस कम्युनिटीज या संस्थेच्या सहकार्याने मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात



आले होते. या मार्गदर्शन सत्रामध्ये लाईट हाऊस कम्युनिटीज फाउंडेशनच्या क्लस्टर हेड पूजा मोगरे, सहाय्यक व्यवस्थापक लखन रोकडे, फॅसिलिटेटर आणि समुपदेशक प्रियंका घोलप, युवा समन्वयक रेश्मा कांबळे, डिजिटल एम्पावरमेंट फॅसिलिटेटर अमिषा मिश्रा, केपीएमजी कंपनीच्या वतीने मा. विनायक पदमाने आणि पीसीएमसी स्मार्ट सारथीचे प्रतिनिधी उपस्थित होते. युवक आणि महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, यासाठी पिंपरी चिंचवड शहरामध्ये लाईट हाऊस कम्युनिटीज या संस्थेच्या वतीने विविध कोर्स सुरु करण्यात आले आहेत. हे कोर्स रोजगाराभिमुख असून नि:शुल्क उपलब्ध आहेत. लाईट हाऊस प्रकल्पामध्ये अनेक प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण घेत आहेत. सदर प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना आज प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. त्या निमित्ताने मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. मेरा युवा भारत उपक्रमामध्ये सहभागी झाल्यास युवकांना रोजगार, व्यक्तिमत्त्व विकासाच्या अनेक संधी उपलब्ध होणार आहेत. पीसीएमसी स्मार्ट सारथीच्या वतीने सदर प्रशिक्षणार्थ्यांना मेरा युवा भारत उपक्रमामध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच मेरा युवा भारत संकेतस्थळाची माहिती देण्यात आली. यावेळी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अधिकृत ॲप असलेल्या पीसीएमसी स्मार्ट सारथी ॲपविषयी माहिती देण्यात आली. केपीएमजी कंपनीचे मा. श्री. विनायक पदमाने यांनी 'स्वच्छ सर्वेक्षण' या उपक्रमाची माहिती दिली. या कार्यक्रमाला प्रशिक्षणार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

# आमदार सुनिल शेळके यांचे शेतकऱ्यांसाठी आश्वासक पाऊल

## बीव्हीजी ॲग्रोटेकच्या वतीने 'गो से गोमाता' अभियान संपन्न




**मोशी**

**न्यूज एक्सप्रेस मराठी।** आमदार सुनिल शेळके व बीव्हीजी ॲग्रोटेक कंपनीच्या वतीने मावळ तालुक्यातील तीनशे दुग्ध व्यावसायिक शेतकऱ्यांना भाकड जनावरांसाठी वरदान असलेले 'रज्जो' औषधाचे मोफत वाटप करण्यात आले. बीव्हीजी ॲग्रोटेक कंपनीमार्फत तालुक्यात 'गो से गोमाता' अभियान राबविण्यात आले होते.या अभियानांतर्गत पहिल्या टप्प्यात मावळातील १२०० भाकड जनावरे दुभती होणार आहेत. जानेवारी महिन्यात भारत विकास ग्रुपचे अध्यक्ष हणमंतराव गायकवाड यांनी आमदार सुनिल शेळके यांची भेट घेऊन मावळातील शेती, रोजगार अशा विविध क्षेत्रासाठी सहकार्य व मार्गदर्शन करण्याचे आश्वासन दिले होते. त्या अनुषंगाने आमदार सुनिल शेळके यांच्या सहकार्यातून बीव्हीजी ग्रुपने पहिले पाऊल टाकले आहे.

यावेळी आमदार शेळके म्हणाले, बीव्हीजी ॲग्रोटेक कंपनीच्या वतीने आपल्या तालुक्यात सेंद्रिय इंद्रायणी भात निर्मितीसाठी विशेष प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या प्रकल्पाद्वारे भात उत्पादक शेतकऱ्यांना बीव्हीजीची सेंद्रिय खते, औषधे देण्यात येणार आहेत. जगभरात सेंद्रिय शेतमाल निर्मितीची चळवळ शेतकऱ्यांच्या साथीने उभारली जात आहे आणि या चळवळीची सुरुवात आजच्या अभियानाने झाली आहे. बीव्हीजी ग्रुपच्या माध्यमातून अधिकाधिक शेतकऱ्यांना समृद्ध बनविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्याचा मानस आहे. या कार्यक्रमाचे स्वागत अरुण बारगजे यांनी तर आभार रवि घाटे यांनी केले. आमदार सुनिल शेळके व बीव्हीजी ॲग्रोटेक कंपनीच्या वतीने मावळ तालुक्यातील तीनशे दुग्ध व्यावसायिक शेतकऱ्यांना भाकड जनावरांसाठी वरदान असलेले 'रज्जो' औषधाचे मोफत वाटप करण्यात आले. बीव्हीजी ॲग्रोटेक कंपनीमार्फत तालुक्यात 'गो से गोमाता' अभियान राबविण्यात आले होते.या अभियानांतर्गत पहिल्या टप्प्यात मावळातील १२०० भाकड जनावरे दुभती होणार आहेत.

# मुख्यमंत्री शिंदे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

## शिंदे साहेब यांचा वाढदिवस समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा

**पिंपरी-चिंचवड**

**न्यूज एक्सप्रेस मराठी।** साधेपणा, उच्च विचारसरणी आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांची जाण असणारं शिवसेनेचं खंबीर नेतृत्व मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांचा वाढदिवस समाजोपयोगी उपक्रमांनी भोसरी मतदारसंघात मोठ्या उत्साहपूर्वक वातावरणात साजरा करण्यात आला. कोणताही सार्वजनिक डामडौल न करता अत्यंत साधेपणाने वाढदिवस साधेपणाने साजरा करावा, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले होते. त्याला प्रतिसाद देत आरोग्य शिबीर, रक्तदान शिबीर, दिव्यांगांना उपयुक्त सामुग्रीचे वाटप, विविध शालेय स्पर्धा, चित्रकला व निबंध स्पर्धा, वृध्दाश्रमात अन्नदान यांसारख्या विधायक उपक्रमांच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांची सेवा घडावी, हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून शिवसेना उपनेते तथा मा. खासदार शिवाजीदादा आढळराव पाटील व कामगार नेते तथा शिवसेना उपनेते इरफानभाई सय्यद यांच्या मार्गदर्शन व नेतृत्वाखाली सेवा शिबिरांचे आयोजन केले होते. त्याला नागरिकांकडून मोठा प्रतिसाद मिळाला. अबाल-ज्येष्ठांपासून अनेकांनी मुख्यमंत्री एकनाथजी शिंदेसाहेब यांना शुभेच्छा दिल्या.या सेवा कार्यात शिवसेना उपनेते इरफानभाई सय्यद, शिवसेना पुणे जिल्हाप्रमुख भगवान पोखरकर, उपजिल्हाप्रमुख संभाजी शिरसाठ, युवासेना पुणे उपजिल्हाप्रमुख अरूण जोगदंड, शिवसेना भोसरी विधानसभाप्रमुख दत्तात्रय भालेराव, महिला आघाडीच्या मनीषा परांडे, मनीषाताई पवार, उपशहर प्रमुख बळीराम जाधव, वैद्यकीय कक्ष शहरप्रमुख सुनील पवार भोसरी विधानसभा संघटक संदिप जाधव, आशिष गौंड, दत्ता औरळे, साईनाथ ढाकणे, सागर पाचर्णे, रोहित जगताप, पप्पू चौधरी, नुर शेख, महाराष्ट्र मजदुर संघटनेचे प्रवीण जाधव, नागेश व्हणवटे, अमित पासलकर, रत्नाकर भोजने, समर्थ नाईकवाडे, अनिल खपके, चंद्रकांत पिंगट तथा शिवसेना युवासेना महीला आघाडी शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते आदींचा सहभाग लाभला. दरम्यान न्यू महाराष्ट्र विद्यालय रुपीनगर, तळवडे या विद्यालयात विविध शालेय स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. श्री शिवछत्रपती प्राथमिक व माध्यमिक विद्यालय मोरेवस्ती चिखली या विद्यालयात चित्रकला व निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. रुपीनगरमध्ये दिंव्यांग बांधवांना मदत तथा अन्नदान केले. शिवसेना शहर पदाधिकारी तथा शिवसेना प्रणित महाराष्ट्र मजदुर संघटनेच्या वतीने विकास अनाथ आश्रम, चिखली, सावली निवारा केंद्र, पिंपरी वृध्दाश्रम या ठिकाणी अन्नदान करण्यात आले. साहेबांना दिर्घायुष्य लाभो यासाठी वडमुखवाडी येथील श्री. साईबाबा चरणी प्रार्थना करण्यात आली. तसेच मंदिरात भक्तांना ६० किलो लाडू प्रसाद स्वरूपात वाटण्यात आला.

# पुण्याच्या रस्त्यावरही दहशतीचे दर्शन

## फडतूसपणा बंद करा : अंबादासदानवेंचा सरकारवर हल्लाबोल

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर आक्षेपार्ह वक्तव्य केल्याने पुण्यात निर्भय बनो कार्यक्रमाला जात असताना भाजपकडून पत्रकार निखिल वागळे यांच्यावर हल्ला करण्यात आला. त्यांच्यावर शाईफेकदेखील करण्यात आली. यावेळी काही शरद पवार गटाच्या महिलांना भाजपकडून मारहाण करण्यात आल्याचा आरोप महिलांनी केला आहे. त्याचे व्हिडीओदेखील सोशल मीडियावर व्हायरल झाले. या प्रकरणावरुन आता विरोधीपक्षाकडून टीका केली जात आहे. हा सगळा प्रकार म्हणजे दडपशाही असल्याचं विरोधक म्हणत आहे. यातच आता विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवेंनी सरकारवर चांगलाच हल्लाबोल केला





आहे. फडतूसपणा बंद करा, पुण्याच्या रस्त्यावरच दहशतीचे दर्शन होत असल्याचं ते म्हणाले आहेत. अंबादास दानवे यांनी ट्वीट करत पंतप्रधान मोदींवर देखील निशाणा साधला आहे. त्यांनी ट्वीटमध्ये लिहिलंय की, पंतप्रधान मोदी महिला सबळ करण्याच्या गप्पा करतात आणि त्यांचे भक्त हे महिलांना मारहाण करतात. गुंड केवळ मंत्रालयात नाहीत तर आता पुण्याच्या रस्त्यावरही दहशतीचे दर्शन घडवू लागले आहेत. गुन्हा दाखल करण्याचे काम झाले असेल, पण किती कार्यकर्त्यांना अटक झाली? हे सांगा.. पत्रकार निखिल वागळे यांच्या गाडीवर हल्ला करीत असताना त्यांच्या संरक्षणासाठी सरसावलेल्या भक्ती कुंभार आणि इतर भगिनींना देखील भाजपाच्या गुंडांनी मारहाण केल्याचा व्हिडीओ आहे. अंबादास दानवे यांनी व्हिडीओ ट्वीट केला आहे. त्यात वागळेंवर झालेल्या हल्ल्यात जखमी झालेली महिला दिसत आहे. या महिलेच्या अंगावर शाई उडलेली दिसत आहे. 'भाजपच्या युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांच्या घरात महिला नाही आहेत. त्यांनी त्यांच्या आईच्या पोटी जन्म घेतलेला नाही आहे. या कार्यकर्त्यांनी विरोधक असलेल्या महिलांच्या अंगावर शाईफेक केली, दगडफेक केली. त्यासोबत पुरुषांनी काही महिलांचे कपडेदेखील फाडले. ही पुण्याची संस्कृती आहे का?छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांची तुम्ही भाषणं करता. ती भाषणं फक्त देऊ नका तर ते भाषणं तुम्हीदेखील ऐका. देश नेमका कोणत्या मार्गाने पुढे जात आहे. जरा माणुसकीच्या नात्याने लोकांबरोबर वागा. पोलीस प्रशासनाला सगळ्या गोष्टी माहिती असूनही कोणी मदतीला पुढे आलं नाही. पोलिसांवरही गुन्हे दाखल व्हावे, अशी कळकळीची विनंती पोलीस अधिकाऱ्यांना करते. महिलांनी राजकारणात उतरायचं की नाही, अ हा सगळा प्रकार म्हणजे दडपशाही असल्याचं विरोधक म्हणत आहे. यातच आता विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवेंनी सरकारवर चांगलाच हल्लाबोल केला आहे. एक्सवर त्यांनी एक व्हिडीओ ट्वीट केला आहे. फडतूसपणा बंद करा, पुण्याच्या रस्त्यावरच दहशतीचे दर्शन होत असल्याचं ते म्हणाले आहेत. अंबादास दानवे यांनी ट्वीट करत पंतप्रधान मोदींवर देखील निशाणा साधला आहे. त्यांनी ट्वीटमध्ये लिहिलंय की, पंतप्रधान मोदी महिला सबळ करण्याच्या गप्पा करतात आणि त्यांचे भक्त हे महिलांना मारहाण करतात. गुंड केवळ मंत्रालयात नाहीत तर आता पुण्याच्या रस्त्यावरही दहशतीचे दर्शन घडवू लागले आहेत. गुन्हा दाखल करण्याचे काम झाले असेल, पण किती कार्यकर्त्यांना अटक झाली? हे सांगा.. फडतूसपणा बंद करा.. पत्रकार निखिल वागळे यांच्या गाडीवर हल्ला करीत असताना त्यांच्या संरक्षणासाठी सरसावलेल्या भक्ती कुंभार आणि इतर भगिनींना देखील भाजपाच्या गुंडांनी मारहाण केल्याचा व्हिडीओ आहे. अंबादास दानवे यांनी व्हिडीओ ट्वीट केला आहे. त्यात वागळेंवर झालेल्या हल्ल्यात जखमी झालेली महिला दिसत आहे.

# निखिल वागळेंची भररस्त्यात पाठलाग करून गाडी फोडली

## निखिल वागळे यांना विरोध केल्याने भर रस्त्यावर घनघोर संघर्ष

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** पुण्यामध्ये 'निर्भय बनो' कार्यक्रमासाठी जाताना ज्येष्ठ पत्रकार निखिल वागळे यांच्या गाडीवर प्राणघातक हल्ला करण्यात आला. निखिल वागळे यांच्या गाडीवर हल्ला करणाऱ्या भाजपच्या दहा कार्यकर्त्यांना पुणे पोलिसांनी अटक केली आहे. दीपक पोटे ,बापू मानकर, गणेश शेरला ,गणेश घोष, स्वप्निल नाईक प्रतीक देसरडा दुशांत मोहोळ दत्ता सागरे, गिरीश मानकर आणि राहुल पायगुडे यांना पोलिसांनी अटक केली आहे. पुण्यामध्ये शुक्रवारी रात्री भाजपने निखिल वागळे यांना विरोध केल्याने भर रस्त्यावर घनघोर संघर्ष पाहायला मिळाला. निखिल वागळे कार्यक्रमस्थळी पोहोचत असताना तब्बल चार ठिकाणी त्यांच्या गाडीवर प्राणघातक हल्ला करण्यात आला. चार ठिकाणी त्यांची गाडी फोडण्यात आली. हा हल्ला भाजपच्या कार्यकर्त्यांकडून करण्यात



आल्याचा आरोप आयोजकांसह निखिल वागळे यांनी केला होता. निखिल वागळे बसलेल्या गाडीवर दगड, अंडी, शाई असेल मिळेल ते फेकून मारण्यात आले. यानंतरही निर्धाराने निखिल वागळे यांनी कार्यक्रमस्थळी पोहोचले. वागळे यांनी जोरदार भाषण करताना भाजपच्या धमक्यांना किंवा हल्ल्यांना भीक घालत नसल्याची टीका केली. दुससरीकडे निखिल वागळे यांच्यासह सभा आयोजकांवरती गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राष्ट्र सेवा दलाच्या बाहेर आंदोलन करणाऱ्या ४३ पदाधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी कार्यकर्तेच नाही, तर भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे यांच्यावरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पर्वती पोलीस ठाण्यात गुन्हा दखल करण्यात आला आहे. निखिल वागळे यांनी लालकृष्ण अडवाणी यांना भारतरत्न घोषित झाल्यानंतर ट्विट करून पीएम मोदी यांच्यावर टीका केली होती. यानंतर पुण्यात येत असलेल्या वागळे यांची सभा उधळून लावण्याचा इशारा भाजपने दिला होता. निखिल वागळेंविरोधात गुन्हाही दाखल करण्यात आला आहे. दुसरीकडे, भाजपकडून महिलांना मारहाण करण्यात आल्याचा आरोप महिलांनी केला आहे. आम्ही पोलिसांतची मदत मागत होतो.

# कर्णकर्कश आवाज काढणाऱ्या सायलेन्सरवर फिरवले बुलढोझर!

## ५७१ बुलेटस्वारांविरुद्ध करण्यात आली कारवाई

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** सायलेन्सरमध्ये फेरफार करून फटाक्यासारखे आवाज काढणाऱ्या बुलेटचालकांविरुद्ध वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला. वाहतूक पोलिसांनी दोन दिवसांत शहरातील वेगवेगळ्या भागांत कारवाई करून ५७१ बुलेटस्वारांविरुद्ध कारवाई केली असून, सायलेन्सर जप्त करण्यात आले आहेत. वाहतूक पोलिसांनी जप्त केलेल्या सायलेन्सरवर बुलडोझर चालवून ते नष्ट करण्यात आले. सायलेन्सरमध्ये फेरफार केल्यानंतर (मॉडिफाय) फटाक्यासारखा आवाज येतो. रात्री-अपरात्री



फटाक्यासारखे आवाज काढून फिरणाऱ्या बुलेटचालकांमुळे नागरिकांना त्रास होत असल्याच्या तक्रारी आल्या होत्या. त्यानंतर वाहतूक पोलिसांनी बुलेटचालकांविरुद्ध कारवाईचा बडगा उगारला. दोन दिवसांत ५७१ बुलेटस्वारांविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. सायलेन्सर जप्त करण्यात आले आहेत. जप्त केलेले सायलेन्सर नष्ट करण्यात आल्याची माहिती वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त शशिकांत सायलेन्सरमध्ये फेरफार केल्यानंतर फटाक्यासारखा आवाज निर्माण होतो. शाळा, महाविद्यालये, रुग्णालयाच्या परिसरात बुलेटचालक फटाक्यासारखे आवाज काढून फिरायचे. त्याचा त्रास सामान्यांना सहन करावा लागत होता. शहरातील सर्व भागांत बुलेटचालकांविरुद्ध कारवाई करण्यात आली. हडपसर, कोरेगाव पार्क, विमानतळ, हांडेवाडी, डेक्कन, भारती विद्यापीठ भागात हे प्रकार सर्वाधिक असल्याचे कारवाईत दिसून आले. कारवाई केलेल्या बुलेटचालकांकडून दंड वसूल करण्यात आला. सायलेन्सरचा पुनर्वापर होऊ नये म्हणून ते नष्ट करण्यात आले. येरवड्यातील वाहतूक शाखेच्या मोकळ्या जागेत सायलेन्सरवर बुलडोझर चालवून नष्ट करण्यात आले, असे बोराटे यांनी सांगितले.बोराटे यांनी दिली.सायलेन्सरमध्ये फेरफार करणे, तसेच वाहतूक नियमभंग करणाऱ्यांविरुद्ध वाहतूक पोलिसांनी टसअॅप क्रमांक (८०८७२४०४००) उपलब्ध करून दिला आहे.

### ५७१ बुलेटस्वारांविरुद्ध कारवाई

**» सायलेन्सरमध्ये फेरफार करून फटाक्यासारखे आवाज काढणाऱ्या बुलेटचालकांविरुद्ध वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला. वाहतूक पोलिसांनी दोन दिवसांत शहरातील वेगवेगळ्या भागांत कारवाई करून ५७१ बुलेटस्वारांविरुद्ध कारवाई केली असून, सायलेन्सर जप्त करण्यात आले आहेत. वाहतूक पोलिसांनी जप्त केलेल्या सायलेन्सरवर बुलडोझर चालवून ते नष्ट करण्यात आले.सायलेन्सरमध्ये फेरफार केल्यानंतर (मॉडिफाय) फटाक्यासारखा आवाज येतो.**

# अमोल कोल्हेंची उमेदवारी जाहीर करून टाकली!

## अजित पवारांनी अमोल कोल्हेंविरोधात थेट दंड थोपटले

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** राष्ट्रवादीच्या फुटीपासून चर्चेत असलेल्या शिरुरचे खासदार अमोल कोल्हे यांना शरद पवार गटाकडून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील (गरूर्पी झरींळश्र) यांनी त्यांच्या उमेदवारीची घोषणा केली. शिरूर लोकसभा निश्चय मेळावा आणि भोसरी विधानसभेची आढावा बैठक जयंत पाटलांच्या उपस्थितीत झाली. या बैठकीत जयंत पाटलांनी अमोल







कोल्हेंच्या उमेदवारीर शिक्कामोर्तब केले. अमोल कोल्हे अजित पवार यांनी राष्ट्रवादीला खिंडार पाडल्यापासून चर्चेत आहेत. कोणता झेंडा हाती घेऊ असा मनस्थितीत असल्याचे त्यांच्या वर्तनातून समोर आलं आहे. अजित पवारांच्या शपथविधीला उपस्थित राहिल्यानंतर त्यांनी नंतर भूमिका बदलून शरद पवार यांना पाठिंबा दिला होता. यानंतर निवडणुक आयोगात दोन्ही गटाकडून लढाई सुरु झाल्यानंतर त्यांनी दोन्ही गटाकडून प्रतिज्ञापत्र सादर केले होते. नंतर त्यांनी पुन्हा अजित पवार गटाकडून फसवून प्रतिज्ञापत्र घेतल्याचा आरोप केला होता. त्यामुळे या सर्व पार्श्वभूमीवर जयंत पाटील यांनी त्यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब केलं आहे.

दुसरीकडे, अजित पवारांनी अमोल कोल्हेंविरोधात थेट दंड थोपटले आहेत. अमोल कोल्हेंना निवडून आणण्यासाठी जीवाचं रान केलं, पण यावेळी पाडणार म्हणजे पाडणारच, असं म्हणत अजित पवारांनी अमोल कोल्हेंना थेट आव्हान दिलं आहे. यानंतर अजित पवार यांना कोल्हे यांनी सुद्धा प्रत्युत्तर देत डिवचले होते. सरकार सोडवू न शकलेल्या समस्या मी शेतकरी आक्रोश मोर्चातून मांडत आहे. त्यामुळं अजित दादांची चिडचिड होते का? हे तुम्ही त्यांनाच विचारा. असं म्हणत कोल्हे यांनी बारामती विधानसभेतील शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा पाढा वाचलवा होता. सत्ता संघर्षावेळी जनता आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी सत्तेत गेल्याचं ते म्हणाले. ते मंत्री झाल्यावर त्यांचं जेसीबीतून पुष्पवृष्टी करत जंगी स्वागत झालं. पण आता मात्र त्यांना शेतकऱ्यांचा विसर पडला. म्हणूनच शेतकरी मला कांदा, खर्डा-भाकरी देऊन साधपणाने स्वागत करतायेत अन त्यांचे प्रश्न मांडायला साथ देतायेत, असं कोल्हे यांनी म्हटले होते.